# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य २०१९-२०/डीबीटी/ 6576 दि. ८.१०.२०२०

**तात्काळ ईमेलद्वारा**

8 OCT 2020

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत.**

राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची विहीत कालावधीमध्ये पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वेळोवेळी मुदतवाढ देऊनही, दि. ८.१०.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार अद्यापही एकूण **४,२८८** विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांच्या स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने महाविद्यालय व विभागस्तरावर प्रलंबित अर्जाची पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार, महाआयटी कार्यालयाच्या संदर्भिय इमेलनुसार, **सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १० ऑक्टोंबर, २०२० आणि विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १५ ऑक्टोंबर, २०२० अशी अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ उपलब्ध होणार नाही. तसेच सदरहू मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत.

त्यामुळे आपल्या विभागामधील ज्या महाविद्यालयांच्या स्तरावर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत, अशा महाविद्यालयांचा आढावा घेऊन महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित अर्ज मुदतीमध्ये निकाली काढणेबाबत तात्काळ सूचना देण्यात याव्यात. तसेच दिलेल्या मुदतीनंतर महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जाच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठाच्या बाबतीत संबंधित कुलसचिव तसेच विभाग स्तरावर प्रलंबित अर्जाच्या बाबतीत संबंधित विभागीय सहसंचालक जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित - कायम विनाअनुदानित महाविद्यालये.